# वार्षिक अहवाल (बी एड)

## सन- २०२१--२०२३

आज दिनांक ७ फेब्रुवारी २०२२ रोजी ॲड. भगवान केणी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वार्षिक स्नेहसम्मेलन आयोजित करण्यात आले आहे. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ॲड. भगवान केणी सर, प्रमुख पाहुण्या संस्थेच्या सचिवा सौ. देवांगना भगवान केणी मॅडम, संस्थेचे पदाधिकारी, सहकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, अध्यापक वर्ग, कर्मचारी, हितचिंतक, परिसरातील सुजाण नागरिक, जागृत पालक वर्ग आणि विद्यार्थी मित्रांनो...

ॲड. भगवान केणी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवता कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (बी. एड्.) सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाचा ,बारावा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करतांना आम्हांला अतिशय आनंद होत आहे. " ज्या समाजामध्ये आपला जन्म झाला, त्यांचा उध्दार करणे हे आपले कर्तव्य आहे, ही जाणीव ज्यांना आहे. ते धन्य होत" या सुविचाराला साजेसे व्यक्तिमत्व म्हणजे संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. ॲड. श्री. भगवान केणी सर, संस्थेच्या सचिवा सौ. देवांगना केणी मॅडम आपली शैक्षणिक संस्था नावारूपाला नेण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत.

मा. संस्थापक डॉ. ॲड. भगवान केणी सर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेवून त्या शिक्षणाचे महत्त्व जाणून समाजाला ज्ञानाचा वसा देण्यासाठी पायापासून कळसापर्यंत परिपूर्ण ज्ञानमंदिर उभारले आहे.

सन १९९५ मध्ये लावलेल्या एका छोट्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले. या वटवृक्षाच्या फांद्या म्हणजे सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राथमिक व माध्यमिक विद्यालये खारेगाव येथे सकाळ व दुपार अधिवेशनात सुरु झाली.

सन २००४-२००५ साली इंग्रजी माध्यमाचे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय सुरु करण्यात आले.

सन २००५-२००६ सालापासून जयभगवान कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च डी.टी.एड्. ( डी. एड्. ) व बी.एड्. अध्यापक महाविद्यालय सूर्यापाडा, एच.पी. पेट्रोलपंप समोर, विटावा, कळवा जिल्हा ठाणे येथे सुरु करण्यात आली. सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात ॲड. भगवान केणी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित " देवता कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, खारेगांव, कळवा जिल्हा ठाणे येथे डी.टी.एड्. व बी.एड्. महाविद्यालये सुरु करण्यात आली. सन २००७-२००८ मध्ये बी.एम.एस./बी.एस.सी.आय.टी./ बी.एस.सी. कॉम्प्युटर व बी.एस.सी. सायन्स अभ्यासक्रमासाठी संस्थेला मान्यता मिळाली आहे.

देवता कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲन्ड रिसर्च (बी. एड्.)

देवता बी.एड्. कॉलेज २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात अभ्यासपूरक व अभ्यासानुवर्ती विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ चा बी.एड.चा निकाल

विद्यार्थी संख्या : ३४

परीक्षेचा निकाल : ९९ टक्के

२) २०२०-२०२१ मध्ये ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता,३३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यावेळी ९९ टक्के निकाल लागला होता.

O+ : १ विद्यार्थी

A+ : ९ विद्यार्थी

A : २० विद्यार्थी

B+ : ३ विद्यार्थी

B : ० विद्यार्थी

गैरहजर विद्यार्थी : ० विद्यार्थी

अनुत्तीर्ण विद्यार्थी : १ विद्यार्थी

1) २१ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रथम आणि द्वितीय
वर्षातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज जयंती ऑनलाईन पद्धतीने साजरी करण्यात आला.

ऑडिओसह पीपीटी सादरीकरण:
व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरूपात भाषण:

2) २७ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रथम आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी मराठी राजभाषा दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.

ऑडिओसह पीपीटी सादरीकरण:
व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरूपात भाषण:
३)२८ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रथम आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी मराठी

सायन्स दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.
ऑडिओसह पीपीटी सादरीकरण:
व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरूपात भाषण:

४) ८ मार्च २०२२ रोजी प्रथम आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी महिला दिन ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला.

ऑडिओसह पीपीटी सादरीकरण:
व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या स्वरूपात भाषण:

५) बी एड अभ्यासाअंतर्गत ( Fourth semester & First semester) Community Work या साठी बी एड च्या दोन्ही वर्षातील विद्यार्थ्यांना दिनांक २८|०३|२०२२ ते ०१| ०४|२०२२ रोजी प्राचार्या
सुरेखा कदम मॅडम तसेच प्राध्यापक रामदास डुंबरे सर, शिरीष देशमुख सर आणि प्राध्यापिका सौ आशा पिंगळे मॅडम यांच्यासोबत पनवेल (नेरे) ठिकाणी नेण्यात आले.
२८|०३|२०२२ : श्रमदान आणि सर्पमित्र व्याख्यान
२९|०३|२०२२ : श्रमदान आणि राजीव आधार गृहास भेट
२९|०३|२०२२ : श्रमदान आणि रामकृष्ण वृद्धाश्रमास भेट
३१|०३|२०२२: श्रमदान आणि कुष्ठरोग पुनर्वसन केंद्र भेट
०१|०४|२०२२ : आश्रम शाळेला भेट आणि तारफा नृत्य

६)१ मे २०२२ रोजी कॉलेजचे अध्यक्ष डॉ.ॲड. भगवान केणी सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

७) १६ जुलै २०२२ रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला.
भाषण स्पर्धा

८) १९ जून २०२१ रोजी ऑनलाईन झूम मीटिंग द्वारे " National Reading Day" साजरा करण्यात आला.

कविता वाचन स्पर्धा

पुस्तक सारांश स्पर्धा

भाषण स्पर्धा

९) ५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

भाषण स्पर्धा

१०) २ऑक्टोबर २०२२ रोजी महात्मा गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

भाषण स्पर्धा

११) १५ ऑक्टोबर २०२२ रोजी " वाचनप्रेरणा दिन " साजरा करण्यात आला

कविता वाचन स्पर्धा

पुस्तक सारांश स्पर्धा

१२) १८ ऑक्टोबर २०२२ रोजी दिवाळी उत्सव साजरा करण्यात आला. त्यावेळी कॉलेज मध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

पणती डेकोरेशन

आकाशकंदील बनविणे

रांगोळी

मेहंदी

भेटकार्ड बनविणे

१३) २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.
संविधान वाचन

१४) २ जानेवारी २०२३ प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांचा उद्बबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे मनोगत
अध्यक्षांचे भाषण
विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी संस्थेचे संस्थापक डॉ. ॲड. भगवान केणी व सचिवा सौ. देवांगना केणी मॅडम यांनी २ जानेवारी २०२३ रोजी पारितोषिक वितरण करण्यात आले.

वरील प्रमाणे सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध कार्यक्रम सण, उत्सव ऑफलाइन आणि ऑनलाईन झूम मीटिंग द्वारे साजरे करण्यात आले. आपल्या संस्थेचे अध्यक्ष डॉ अँड. भगवान केणी सर यांनी ऑनलाईन परिक्षा घेण्यासाठी झूम अपचे subscription विकत घेतले होते.

कॉलेजच्या उन्नतीमागे सिंहाचा वाटा उचलणारे संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष, सचिव, सदस्य, कॉलेजच्या प्राचार्या, प्राध्यापक वर्ग , शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग, पालक वर्ग यांचे वेळोवेळी मिळणारे अनमोल मार्गदर्शन आणि उत्तम सहकार्य यामुळेच शक्य झाले. यासाठी कॉलेज या सर्वाचे सदैव ऋणी राहील.
तुमची उदारता आणि मदत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे. पुन्हा एकदा, तुमच्या प्रोत्साहनासासाठी धन्यवाद.

आमचे कॉलेज यशस्वी वाटचालीसाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू अशी आपणांस ग्वाही देवून हा अहवाल संपवितो.

जय महाराष्ट्र !!!!!

कार्यक्रमाची रूपरेखा

१) सरस्वती पूजन / दीप प्रज्ज्वलन

२) स्वागत गीत

३) प्रमुख पाहुण्यांचा परिचय

४) प्रमुख पाहुण्यांचा सत्कार

५) अहवाल वाचन

६) प्रमुख पाहुण्यांचे भाषण

७) अध्यक्षीय भाषण

८) विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन

९) आभार प्रदर्शन

१०) वन्दे मातरम्!

# देवता कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च,
# खारेगाव, कळवा, जिल्हा ठाणे

## !! बी. एड. विभाग !!

# वार्षिक अहवाल

## 2021 - 2023